राज्यातील लोककलावंतांना अनुदान पॅकेज
(१) कलापथकांना भांडवली खर्चासाठी अनुदान
(२) कलापथकांना प्रयोगासाठी अनुदान.

महाराष्ट्र शासन
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग
शासन निर्णय क्रमांक लोकअ. २००७/प्र.क्र. १२७/सां.का. ३,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२,
दिनांक १ जानेवारी २००८

संदर्भ.— संचालक, सांस्कृतिक कार्य, मुंबई यांचे पत्र क्र. सांकार्स-८८५, दि.२९ जानेवारी २००७.

प्रस्तावना.— राज्यातील सांस्कृतिक व पारंपरिक कलेची लोकांनां माहिती व्हावी तसेच त्याचे जतन व संवर्धन करण्यासाठी सांस्कृतिक क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांना प्रोत्साहन देण्याचे कार्य सांस्कृतिक विभागातर्फे करण्यात येते. यासाठी राज्यात नाट्य/संगीत नाट्य महोत्सव, चित्रपट महोत्सव, तमाशा महोत्सव इत्यादी महोत्सव आयोजित केले जातात. चित्रपट निर्मात्यांना मराठी चित्रपट निर्मितीसाठी अनुदान दिले जाते, सांस्कृतिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थांना अनुदान दिले जाते. नवीन नाटकाचे प्रयोग करण्यासाठी नाट्य संस्थानांही अनुदान दिले जाते. त्याच धर्तीवर राज्याच्या कानाकोपऱ्यात विशेषतः ग्रामीण भागात लावणी, तमाशा, दशावतार, खडीगंमत इत्यादी सारख्या लोककला प्रकार सादर करणाऱ्या संस्थांनी अनुदान देण्याची विनंती शासनास केली होती. या लोक कलाप्रकारांसाठी पॅकेज देण्याची जाहीर घोषणा मा.मुख्यमंत्री यांनी नारायणगाव, पुणे येथे केली होती. त्यास अनुसरून पूर्णवेळ तमाशा करणारा फड, हंगामी तमाशा करणारा फड, दशावतार मंडळे, खडीगंमत कलापथके, लावणी कलापथके आणि शाहीरी पथके यांना अनुदान देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. विचाराअंती शासनाने खालीलप्रमाणे निर्णय घेतला आहे :—

शासन निर्णय.— महाराष्ट्राच्या सर्व लोककला टिकून राहाव्यात, या लोककलांची पुढील पिढीला माहिती व्हावी आणि महाराष्ट्रातील एकूणच सर्व पारंपरिक लोककलांचे जतन करण्यासाठी या लोककलांना उत्तेजन देण्याच्या हेतूने कलापथकांना आर्थिक मदत देण्याच्या खालील दोन योजनांना शासन मान्यता देत आहे :—

(१) कलापथकांना भांडवली खर्चासाठी अनुदान.— कलापथकांना वेशभूषा, वाद्य, रंगभूषा साहित्य, तंबू साहित्य, वीज ध्वनी साहित्य व वाहन साहित्य इत्यादी भांडवली स्वरूपाच्या खर्चासाठी खालीलप्रमाणे एकूण रुपये ५०.०० लक्षचे अनुदान वितरीत करण्यास शासन मान्यता देत आहे —

| अ.क्र. | अनुदानाची रक्कम | कलापथकांची कमाल संख्या | एकूण अनुदान |
|---|---|---|---|
| १ | २,००,००० | १० | २०,००,००० |
| २ | १,००,००० | १० | १०,००,००० |
| ३ | ५०,००० | २० | १०,००,००० |
| ४ | २५,००० | ४० | १०,००,००० |
| | एकूण . . | ८० | ५०,००,००० |

(एकूण रुपये पन्नास लक्ष फक्त)

भांडवली खर्चासाठी वरीलप्रमाणे एका कलापथकास जास्तीत जास्त रुपये २.०० लक्ष अनुदान भांडवली खर्च भागविण्यासाठी देण्यात येईल. कला पथकास दर ३ वर्षांनी अनुदान देण्यात यावे म्हणजे ज्या आर्थिक वर्षात अनुदान दिले असेल त्या पुढील २ वर्षांसाठी ती संस्था अनुदानास पात्र ठरणार नाही. अनुदानाच्या रकमेनुसार कला पथकांच्या संख्येत बदल करण्याचे अधिकार शासनाचे राहतील. मात्र कलापथकांची एकूण संख्या ८० एवढी मर्यादित राहील आणि एकूण अनुदानाची मर्यादा ५०.०० लक्ष राहील. भांडवली खर्चासाठी अनुदान प्रत्येक कलापथकाला जास्तीत जास्त दोन वेळा देय राहील. या योजनेसाठी नियुक्त केलेली शिफारस समिती कलापथकांची वर्गवारी व निवड करील

(२) कलापथकांना प्रयोगासाठी अनुदान.— ज्याप्रमाणे नाट्यनिर्मिती संस्थांना नाट्य प्रयोगासाठी अनुदान दिले जाते, त्या धर्तीवर लोक कलापथकांना त्यांच्या प्रयोगासाठी आर्थिक वर्षात खालीलप्रमाणे अनुदान अनुज्ञेय राहील :—

| अ.क्र. | कलापथक/कला प्रकार | प्रत्येक प्रयोगासाठी अनुदान | जास्तीत जास्त प्रयोग संख्या | प्रत्येक कलापथकास मिळणारी रक्कम | कला-पथकांची कमाल संख्या | कला प्रकारवार एकूण खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | पूर्णवेळ ढोलकी फड/तमाशा फड | ३०,००० | २० | ६,००,००० | १० | ६०,००,००० |
| २ | हंगामी तमाशा फड, आणि दशावतार मंडळे. | १५,००० | २० | ३०,००० | ४० | १,२०,००,००० |
| ३ | खडीगंमत कला पथके आणि शाहीरी पथके/लावणी कला पथके (संगीत बारी) | ७,००० | २० | १,४०,००० | ३० | ४२,००,००० |
| | | | | एकूण .. | ८० | २,२२,००,००० |

(एकूण रुपये दोन कोटी बावीस लक्ष फक्त)

योजनेंतर्गत अनुदान प्राप्त करणाऱ्या कलापथकांनी सादर केलेल्या कलाकारांच्या यादीनुसार मानधन वितरित करणे कलापथकांना बंधनकारक राहील. लोककला पथकांनी १० प्रयोग केल्यानंतर त्याबाबतचा तपशील सादर केल्यावर १० प्रयोगांच्या खर्चाची प्रतिपूर्ती करण्यात यावी. या योजनेनुसार कलापथकांना प्रयोगासाठी देण्यात येणाऱ्या एकूण अनुदानाची वार्षिक मर्यादा रु. २,२२,००,००० (रु. दोन कोटी बावीस लाख) एवढी राहील.

या दोन्ही योजनांसाठी आस्थापनाविषयक खर्च भागविण्यासाठी रु. ३.०० लाख एवढ्या खर्चास प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

२. वरील योजनांसाठी कलापथकांचे पात्रतेचे निकष खालीलप्रमाणे असतील :—

(१) प्रयोगासाठी अनुदान योजनेंतर्गत अर्ज करताना कलापथकाने त्यांचे पथकात काम करणाऱ्या कलावंतांची नावे व त्यांचे पत्ते देणे बंधनकारक आहे,

(२) पूर्णवेळ तमाशा फड/ढोलकी फड : एका वर्षात तमाशाचे किमान १०० खेळ सादर करणारे कलापथक,

(३) हंगामी तमाशा फड : एका वर्षात किमान ५० खेळ करणारे पथक,

(४) दशावतार मंडळ : एका वर्षात १०० प्रयोग करणारे कोकणातील पारंपरिक दशावतार खेळ सादर करणारी व्यावसायिक मंडळे,

(५) खडीगंमत कलापथके : एका वर्षात किमान १०० कार्यक्रम सादर करणारे विदर्भ भागात पारंपरिक खडीगंमत कलाप्रकार सादर करण्याची पूर्णवेळ व्यवसाय करणारी कलापथके,

(६) शाहीरी कलापथके : एका वर्षात किमान १०० कार्यक्रम सादर करणारी केवळ पारंपरिक पोवाडे सादर करण्याचा पूर्णवेळ व्यवसाय करणारी कलापथके,

(७) लावणी कलापथके (संगीत बारी) : संगीत कला केंद्रावर किमान दहा वर्षे पारंपरिक लावणी प्रकार सादर करणारे पथके.

३. वरील दोन्ही योजनांसाठी अर्जाची छाननी करण्यासाठी आणि कलापथकांची पात्रता तपासण्यासाठी निवड करण्यासाठी संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे अध्यक्षतेखाली खालीलप्रमाणे शिफारस समिती गठित करण्यात येईल :—

शिफारस समिती

| | | |
|---|---|---|
| (१) संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय | .. | अध्यक्ष |
| (२) तमाशा, दशावतार, शाहीरी, आणि खंडीगंमत या चार कलाप्रकारातील प्रत्येकी एक तज्ज्ञ | .. | ४ सदस्य |
| (३) तमाशा, दशावतार, शाहीरी, आणि खंडीगंमत या चार कलाप्रकारातील प्रत्येकी एक व्यावसायिक | .. | ४ सदस्य |
| (४) सह संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय | .. | सदस्य-सचिव |

४. समितीची कार्ये :—

(१) ही समिती अर्जदाराने सादर केलेले पुरावे आणि निकष या आधारे पथकाला या योजने साठी पात्र/अपात्र ठरवेल.

(२) अनुदानासाठी पात्र ठरणाऱ्या कलापथकांना एका वर्षात जास्तीत जास्त २० प्रयोगांसाठी अनुदान अनुज्ञेय राहील. सदर २० प्रयोग सादर करण्याचे पुरावे तपासून पाहाणे, जसे की, जाहिरात, हॅंडबिल, निमंत्रणपत्रिका, तिकिटे, आयोजकाचे पत्र इत्यादी आणि समिती निश्चित करेल अशा निकषांचे आधारे पात्र कलापथकांची निवड करेल.

(३) भांडवली खर्चासाठी अनुदान योजनेंतर्गत कलापथकांच्या वर्गवारीचे निकष ठरविणे, पात्रतेचे निकष ठरविणे, भांडवली खर्चाचा तपशील तपासून पाहणे. या बाबी निश्चित करणे व त्यानुसार अर्जदार पथकांची निवड करेल.

५. समितीने शिफारस केलेल्या पात्र कला पथकांना शासनाची मान्यता घेऊन अनुदान वितरित करण्याची कार्यवाही संचालक, सांस्कृतिक कार्य यांनी करावी. अनुदान प्राप्त कलापथकांनी उपयोगिता प्रमाणपत्र ३ महिन्यांचे आत संचालकांना सादर करणे बंधनकारक राहील.

६. भांडवली खर्चासाठी आणि प्रयोगासाठी अनुदान योजनेसंदर्भात अंतिम निर्णय शासनाचा राहील. शासन तीन वर्षांनंतर सदर योजनेचा आढावा घेईल.

७. या योजनेचा खर्च "मागणी क्र. झेडडी २ प्रधान लेखाशीर्ष २२०५ - कला व संस्कृति, १०२, कला व संस्कृति यांचे प्रचालन (०५) (०१) कला व सांस्कृतिक संस्थांना सहायक अनुदान (२२०५ १६२३) योजनेतर, ३१ सहायक अनुदान " या लेखाशीर्षातून त्या त्या वर्षी मंजूर करण्यात येणाऱ्या तरतुदीतून भागविण्यात यावा.

८. संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांना यासाठी नियंत्रण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असून त्यांना अथवा त्यांनी प्राधिकृत केलेल्या दुय्यम अधिकाऱ्यास या संबधांच्या देयकावर स्वाक्षरी करण्यास प्राधिकृत करण्यात येत आहे.

९. या योजनेवरील एकूण रु. २,७५,००,००० (रु. दोन कोटी पंच्याहत्तर लाख फक्त) इतक्या खर्चासाठी सन २००८-२००९ च्या अर्थसंकल्पामध्ये खर्चाची नवीन बाब म्हणून तरतूद करण्यात येईल. ही योजना सन २००८-२००९ या आर्थिक वर्षापासून अंमलात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(मीना जोशी)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई
महालेखापाल-१ मुंबई (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य
संचालक, लेखा व कोषागारे, संचालनालय, मुंबई
निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
वित्त विभाग-व्यय १४, मंत्रालय, मुंबई
मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन, यांचे सचिवालय
मा. मंत्री/राज्यमंत्री, (सांस्कृतिक कार्य) यांचे खाजगी सचिव
सचिव (सां.का.) यांचे स्वीय सहाय्यक
पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभागातील सर्व सहसचिव/उपसचिव/कक्ष अधिकारी/
अवर सचिव
सर्व मंत्रालयीन विभाग
निवड नस्ती सां.का. ३

**राज्यातील लोककलावंतांना अनुदान पॅकेज**

(१) कलापथकांना व्यवसायासाठी भांडवली खर्चासाठी अनुदान

(२) कलापथकांना प्रयोगासाठी अनुदान

महाराष्ट्र शासन

पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग

शासन शुद्धिपत्रक क्रमांक लोकअ. २००७/प्र.क्र. १२७/सां.का. ३,

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२,

दिनांक २० जून २००८

**संदर्भ.**— १. पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शासन निर्णय क्र. लोकअ. २००७/प्र.क्र. १२७/ सां.का. ३, दिनांक १ जानेवारी २००८.

**शासन शुद्धिपत्र.**— राज्यातील लोककलावंतांना भांडवली खर्च/प्रयोगासाठी अनुदान देण्याच्या प्रस्तावास दिनांक १ जानेवारी २००८ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली आहे. शासन निर्णयात परिच्छेद क्र. ७ मध्ये या योजनेचा खर्च " मागणी क्र. झेडडी २ प्रधान लेखाशीर्ष २२०५-कला व संस्कृती, १०२, कला व संस्कृती यांचे प्रचालन (०५) (०१) कला व सांस्कृतिक संस्थांना सहायक अनुदान (२२०५ १६२३) योजनेत्तर, ३१ सहायक अनुदान " या लेखाशीर्षाखाली भागविण्यात यावा असे नमूद केले आहे.

त्याऐवजी

या योजनेचा खर्च " मागणी क्र. झेडडी २ प्रधान लेखाशीर्ष २२०५-कला व संस्कृती, १०२, कला व संस्कृती यांचे प्रचालन (०२) (०९) कला व संस्थांना सहायक अनुदान (२२०५ १५३४), ३१ सहायक अनुदान (वेतनेत्तर) योजनांतर्गत योजना " या लेखाशीर्षाखाली मंजूर तरतुदीमधून भागविण्यात यावा असे वाचण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(मीना जोशी)

उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

संचालक, सांस्कृतिक कार्य, महाराष्ट्र राज्य, मुंबई
महालेखापाल-१ मुंबई (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य
लेखा व कोषाधिकारी, मुंबई
निवासी अधिकारी, मुंबई
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
वित्त विभाग-व्यय १४, मंत्रालय, मुंबई
उप सचिव सांस्कृतिक कार्य यांचे स्वीय सहाय्यक
निवड नस्ती सां.का. ३

## लोककलांना अनुदान देण्याची योजना

### अनुदान मंजूर करण्यासंबंधीचे नियम

संदर्भ.— पर्यटन व सांस्कृतिक कार्य विभाग, शा.नि.क्र. लोकअ. २००७/प्र.क्र. १२७/सां.का. ३, दि. १ जानेवारी २००८.

महाराष्ट्रातील लोककलेचे जतन करण्यासाठी या लोककलांना उत्तेजन देण्याच्या हेतूने पूर्णवेळ तमाशा फड, हंगामी तमाशा फड, दशावतार मंडळे, खडीगंमत, लावणी कलापथके आणि शाहीरी कलापथकांना भांडवली खर्चासाठी अनुदान व या कलापथकांना प्रयोगासाठी अनुदान देण्याची ही योजना आहे.

पात्रता :

पूर्णवेळ व्यवसाय करणारे तमाशा फड, हंगामी तमाशा फड, दशावतार मंडळे, खडीगंमत कलापथके, शाहीर पथके, संगीतबारी केंद्रावरील लावणी पथके या योजनेसाठी पात्र असतील.

१. भांडवली खर्चासाठी व प्रयोगासाठी अनुदान देण्यासाठीची व्याख्या

(अ) पूर्णवेळ तमाशा फड अथवा कलापथके : एका वर्षात तमाशाचे किमान १०० खेळ सादर करणारे.

(ब) हंगामी तमाशा फड अथवा कलापथके : एका वर्षात तमाशाचे किमान ५० खेळ सादर करणारे.

(क) दशावतार मंडळे अथवा कलापथके : कोकणातील पारंपरिक दशावतार खेळ सादर करणारे व्यावसायिक मंडळे, जे एका वर्षात किमान १०० प्रयोग सादर करतात.

(ड) खडीगंमत कलापथके : विदर्भ भागात पारंपरिक खडीगंमत प्रकार करणारी एका वर्षात किमान १०० कार्यक्रम सादर करणारी कलापथके.

(ई) शाहीर कला पथके : केवळ पारंपरिक पोवाडे सादर करणारी पूर्णवेळ व्यवसाय असणारी एका वर्षात किमान १०० कार्यक्रम सादर करणारी कलापथके.

संदर्भीय शासन निर्णयानुसार विशेष परिस्थितीत, लोककला अनुदान शिफारस समिती अनुदान पात्रतेसाठी संस्थेची प्रयोग मर्यादा शिफारस समितीस दिलेल्या अधिकारांतर्गत ५० पर्यंत शिथिल करू शकेल. विशेष बाबतीत हंगामी तमाशा फडांचा संदर्भात ही मर्यादा ३० पर्यंत आणता येईल.

(फ) लावणी पथके (संगीतबारी) : संगीत कला केंद्रावर किमान दहा वर्षे पारंपरिक लावणी सादर करणारे तसेच राज्य रंगभूमी प्रयोग परिनिरीक्षण मंडळाचे प्रमाणपत्र असलेली कलापथके. पारंपरिक लावणी सादर करणारे, पारंपरिक कलापथके (कला केंद्राशी संबंधित) यांचे ५ विविध केंद्रावर एकत्र प्रयोग पाहून प्रत्येक केंद्रातून १० अशी ५० पथकांची निवड करण्यात येईल.

२. अनुदान पात्रतेसाठी वरील सर्व कलापथक किमान १० वर्षांपासून अस्तित्वात असले पाहिजे.

अर्ज :

तमाशा फड, हंगामी तमाशा फड, दशावतार मंडळे, खडीगंमत कलापथके, शाहीरी पथके यांना भांडवली खर्चासाठी आणि प्रयोगासाठी अनुदानपात्र ठरण्याकरिता करावयाच्या अर्जाचा नमुना क्र. १ अ सोबतच्या परिशिष्ट ' ए ' येथे देण्यात आला आहे. लावणी पथके (संगीतबारी) यांना भांडवली खर्चासाठी व प्रयोगासाठी अनुदानपात्र ठरविण्यासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना क्र. १ ब सोबतच्या परिशिष्ट ' बी ' येथे देण्यात आला आहे.

समिती :

१. तमाशा फड, हंगामी तमाशा फड, दशावतार मंडळे, खडीगंमत कलापथके, शाहीर पथके यांनी भांडवली खर्चासाठी अनुदान व कलापथकांना प्रयोगासाठी अनुदान देण्याच्या योजनेखाली पात्रता तपासण्यासाठी/निवड करण्यासाठी केलेल्या अर्जांची छाननी करण्यासाठी संचालक, सांस्कृतिक कार्य संचालनालय यांच्या अध्यक्षतेखाली संदर्भीय शासन निर्णयानुसार शिफारस समिती नियुक्त करण्यात येईल. या समितीची रचना पुढीलप्रमाणे असेल —

| | | | |
|---|---|---|---|
| १. | संचालक, सांस्कृतिक कार्य | .. | अध्यक्ष |
| २. | तमाशा, दशावतार, शाहीरी आणि खडीगंमत या चार कला प्रकारातील प्रत्येकी एक तज्ज्ञ | .. | ४ सदस्य |
| ३. | प्रत्येकी एक व्यावसायिक | .. | ४ सदस्य |
| ४. | सह संचालक | .. | सदस्य-सचिव |

याशिवाय आवश्यकतेनुसार समिती आपल्या अधिकारात संबंधित कलाप्रकारांसाठी याक्षेत्रातील तज्ज्ञ, अनुभवी व्यावसायिक, अभ्यासक यांना समिती विशेष निमंत्रित म्हणून बोलावू शकेल.

२. ही समिती तमाशा फड, हंगामी तमाशा फड, दशावतार मंडळे, खडीगंमत कलापथके, शाहिरी पथके यांनी अर्जासोबत सादर केलेल्या जाहिरात, हॅंडबील, निमंत्रण पत्रिका, तिकिटे, आयोजकाचे पत्र, आयोजकांसमवेत पथक प्रमुखाने केलेले करार इत्यादी पुराव्याआधारे समिती निश्चित करेल. अशा निकषांचे आधारे पथकाला या योजनेसाठी पात्र/अपात्र ठरवेल.

३. संदर्भीय शासन निर्णयानुसार शिफारस समिती आपल्या अधिकारातंर्गत लावणी पथकांच्या (संगीतबारी) बाबतीत निवड करताना अस्सल व पारंपरिक लावणी सादर करणाऱ्या लावणी पथकांचा विचार करण्यात येईल. त्यांची निवड करताना शिफारस समिती प्रत्यक्ष पडताळणी करेल आणि लावणीची निवड (२५ गुण), लावणी गायन (२५ गुण), नृत्य (२५ गुण), अदाकारी (१५ गुण) व समग्र परिणाम (१० गुण) या आधारे गुणांकन निवड करतील.

४. भांडवली खर्चासाठी अनुदान योजनेंतर्गत कलापथकांच्या वर्गवारीचे निकष ठरविणे. पात्रतेचे निकष ठरविणे, भांडवली खर्चाचा तपशील तपासून पहाणे. याबाबी निश्चित करणे व त्यानुसार अर्जदार पथकांची नावे निश्चित करतील.

५. अशासकीय समिती सदस्यांना शासनाच्या संबंधित नियमानुसार बैठक भत्ता व प्रवास खर्च व दैनिक भत्ता देय राहील.

अनुदान वितरण :

१. निवडीचे तपशीलवार निकष आणि अटी ठरविण्याचे अधिकार समितीला असतील.

२. शिफारस समितीने शिफारस केलेल्या पात्र कलापथकांना शासनाची मान्यता घेऊन अनुदान वितरित करण्याची कार्यवाही संचालक, सांस्कृतिक कार्य करतील. यासंदर्भात राज्य शासनाचा निर्णय अंतिम असेल.

हा निर्णय कलापथकांना कळविल्यानंतर प्रयोगासाठीच्या अनुदान मागणीसाठी कलापथकांनी अर्ज करावा. अर्जाचा नमुना क्र. २अ परिशिष्ट " सी " येथे देण्यात आला आहे. लावणी कलापथकांसाठी प्रयोग अनुदानाच्या मागणीचा अर्ज क्र. २ब परिशिष्ट " ड " येथे देण्यात आला आहे.

३. (अ) कलापथकांना भांडवली खर्चासाठी अनुदान.— वेशभूषा, पारंपरिक लोकवाद्य, रंगभूषा साहित्य, तंबू साहित्य, वीज ध्वनी साहित्य व वाहन इ. भांडवली खर्चासाठी एकूण रु. ५० लक्षचे अनुदान खालीलप्रमाणे वितरित करण्यात येईल :—

| अ.क्र. (१) | कलापथक/कला प्रकार (२) | अनुदानाची रक्कम (३) | संस्थांची कमाल संख्या (४) | एकूण अनुदान (५) |
|---|---|---|---|---|
| | | रुपये | | रुपये |
| १ | पूर्णवेळ ढोलकी फड/तमाशा फड | २,००,००० | १० | २०,००,००० |
| २ | हंगामी तमाशा फड आणि दशावतार मंडळे. | १,००,००० | १० | १०,००,००० |
| ३ | खडीगंमत कला पथके आणि शाहीरी पथके. | ५०,००० | २० | १०,००,००० |
| ४ | लावणी कलापथके (संगीत बारी) | २५,००० | ४० | १०,००,००० |
| | एकूण | | ८० | ५०,००,००० |

पात्र ठरलेल्या सर्व प्रकारच्या कलापथकांनी भांडवली खर्च अनुदानासाठी परिशिष्ट ' डी ' मध्ये दिल्याप्रमाणे अर्ज क्र. ३ करणे आवश्यक आहे.

एका कलापथकास ३ वर्षात एकदाच अनुदान देण्यात येईल.

ज्या आर्थिक वर्षात अनुदान दिले असेल त्यापुढील २ वर्षांसाठी ती संस्था अनुदानास पात्र ठरणार नाही. अनुदानाच्या रकमेनुसार संस्थांच्या संख्येत बदल करण्याचे अधिकार शासनाचे राहतील. भांडवली खर्चासाठी अनुदान प्रत्येक कलापथकाला जास्तीत जास्त दोन वेळा देण्यात येईल.

(ब) कलापथकांना प्रयोगासाठी अनुदान :

कलापथकांना प्रयोगासाठी पुढीलप्रमाणे अनुदान देण्यात येईल :—

| अ.क्र. | कलापथक/कला प्रकार | प्रत्येक प्रयोगासाठी अनुदान | जास्तीत जास्त प्रयोग संख्या | प्रत्येक कला-पथकास मिळणारी रक्कम | कला-पथकांची कमाल संख्या | कला प्रकारवार एकूण खर्च |
|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) |
| | | | रुपये | रुपये | | |
| १ | पूर्णवेळ ढोलकी फड/तमाशा फड | ३०,००० | २० | ६,००,००० | १० | ६०,००,००० |
| २ | हंगामी तमाशा फड आणि दशावतार मंडळे | १५,००० | २० | ३,००,००० | ४० | १,२०,००,००० |
| ३ | खडी गंमत कलापथके आणि शाहीरी पथके/लावणी कलापथके (संगीत बारी). | ७,००० | २० | १,४०,००० | ३० | ४२,००,००० |
| | | | | एकूण . . | ८० | २,२२,००,००० |

४. पात्र कलापथकांनी परिशिष्ट ' एफ ' नुसार १० प्रयोग केल्याचा तपशील सादर केल्यानंतर संचालकांतर्फे अनुदान दिले जाईल. पात्र ठरल्यापासून एक वर्षाच्या आत अर्जदारांनी २० प्रयोग करणे आवश्यक आहे. कलापथकाची रक्कम पथकाच्या नावाने धनादेशाद्वारे दिली जाईल. या अनुदानाचा फायदा पथकातील कलाकारांना मिळणे अपेक्षित आहे. त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र ३ महिन्यांच्या आत संचालकांना सादर करणे बंधनकारक असेल.

५. लावणी सादर करणाऱ्या कलापथकांसाठी पुढील कार्यपद्धतीनुसार अनुदान देण्यात येईल :

(१) निवड करण्यात आलेल्या कलापथकाला प्रत्येकी रुपये १.४० लाख अनुदान देय असेल. त्याचा लाभ पथकातील कलाकारांना मिळणे अपेक्षित आहे. ही रक्कम कलापथकाची निवड झाल्यानंतर तीन महिन्याच्या अंतराने दोन समान हप्त्यात देण्यात येईल. लावणी कलापथकांनी परिशिष्ट ' एफ ' नुसार प्रयोग सादर केल्यास प्रमाणपत्र दुसऱ्या हप्त्याच्या वितरणापूर्वी देणे आवश्यक असेल. त्याचे उपयोगिता प्रमाणपत्र ३ महिन्यांच्या आत संचालकांना सादर करणे बंधनकारक असेल.

अन्य महत्त्वाचे :

१. या योजनेच्या नियुक्त शिफारस समितीला अथवा त्यांच्या कोणत्याही सदस्याला कलापथकांच्या अनुदान पात्र प्रयोगांच्या वेळी पूर्वसूचना न देता उपस्थित राहण्याचा व हे प्रयोग पारंपरिकरीत्या सादर होत आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घेण्याचा तसेच कलाकारांच्या नावांची पडताळणी करण्याचा व या नियमातील नमूद केलेल्या नियमांचे व अटींचे पथकांकडून पालन होत असल्याची खात्री करून घेण्याचा अधिकार असेल.

२. एखाद्या कलापथकाने या योजनेसाठी विहित करण्यात आलेल्या नियम व शर्तीचे उल्लंघन केले असल्याबद्दल शासनाची खात्री पटली असेल तर अशा अनुदानाची संपूर्ण रक्कम किंवा तिचा काही भाग राखून ठेवण्याचा अधिकार सांस्कृतिक कार्य संचालनालय राखून ठेवील.

३. भांडवली खर्चासाठी आणि प्रयोगासाठी अनुदान योजनेसंदर्भात अंतिम निर्णय शासनाचा राहील. ३ वर्षांनी शासन सदर योजनेचा आढावा घेईल.

४. कलापथकांना प्रयोगासाठी अनुदान देण्याच्या योजनेखाली २० प्रयोग प्रेक्षकांसाठी शक्यतो निःशुल्क असतील व ते जत्रा किंवा यात्रा, महोत्सव, मेळावे, संमेलने, मदतनिधी यांच्या निमित्ताने आयोजित केले जातील. या प्रयोगासाठी स्थानिक यात्रा समितीने किंवा जत्रा समितीने कला पथकांना आयोजक संस्थेच्या वतीने वेगळे मानधन देण्यास शासनाची हरकत असणार नाही. अपवादात्मक परिस्थितीत पथकांनी तिकिटे लावून प्रयोग करण्यास हरकत असणार नाही.

५. सदर खर्च सांस्कृतिक कार्य संचालनालयासाठी मंजूर करण्यात आलेल्या नियतव्ययातून भागविण्यात येईल व लेखाशीर्ष -२२०५, कला व संस्कृती -१०२-कला व संस्कृती यांचे प्रचालन-राज्य योजनांतर्गत योजना (०२)(०९) कला व सांस्कृतिक संस्थांना सहायक अनुदान-३१-सहायक अनुदान (२२०५ १५३४) मागणी क्रमांक झेडडी-२ या लेखाशीर्षांखालील मंजूर तरतुदीतून भागविण्यात येईल.